भारत सरकार

विधि व न्याय मंत्रालय

# तंत्र विकास मंडळ अधिनियम, १९९५

**(१९९५ चा अधिनियम क्रमांक ४४)**

[ १९ मार्च, २००४ रोजी यथाविद्यमान ]

# The Technology Development Board Act, 1995

**(Act No. 44 of 1995)**

[*As in force on the 19th March, 2004*]

संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन, मुंबई ४०० ००४ यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

२००७

[किंमत : रु. १२.००]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १९ मार्च २००४ रोजी यथाविद्यमान असलेला दि टेक्नॉलॉजी डेव्हलपमेंट बोर्ड ॲक्ट, १९९५ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १३, अंक २, दिनांक १४ ऑक्टोबर २००४ यात पृष्ठ १५९ ते १६४ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक १४ ऑक्टोबर २००४.

**टी. के. विश्वनाथन,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of The Technology Development Board Act, 1995 as on the 19th March 2004 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 2, Vol. 13, dated 14th October 2004 on pages 159 to 164.

This authoritative text was published under the authority of the President under section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 19th March 2004.

T. K. VISWANATHAN,
Secretary to the Government of India.

# तंत्र विकास मंडळ अधिनियम, १९९५

## कलमांचा क्रम

**कलमे**

प्रकरण एक

**प्रारंभिक**

१. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

२. व्याख्या.

प्रकरण दोन

**तंत्र विकास मंडळ**

३. मंडळाची स्थापना व समावेशन.

४. मंडळाचा सचिव आणि इतर अधिकारी व कर्मचारी.

५. मंडळाच्या समित्या.

६. मंडळाची कार्ये.

प्रकरण तीन

**वित्तीय सहाय्य मिळण्यासाठी अर्ज करणे**

७. वित्तीय सहाय्य, इत्यादी मिळविण्यासाठी अर्ज करणे.

प्रकरण चार

**वित्तव्यवस्था, लेखे व लेखापरीक्षा**

८. केंद्र सरकारकडून अनुदान व कर्जे.

९. तंत्र विकास व उपाययोजना यासाठी निधी

१०. जमा रकमा व दायित्वांचे हस्तांतरण.

११. अर्थसंकल्प.

१२. वार्षिक अहवाल.

१३. लेखे व लेखापरीक्षा.

१४. वार्षिक अहवाल व लेखापरीक्षकाचा अहवाल संसदेपुढे मांडणे.

प्रकरण पाच

**संकीर्ण**

१५. मंडळाला विवरणे सादर करणे.

१६. निदेश देण्याचा केंद्र सरकारचा अधिकार.

१७. मंडळ निष्प्रभावी करण्याचा केंद्र सरकारचा अधिकार.

१८. प्रत्यायोजन.

१९. मंडळाचे सदस्य, अधिकारी व कर्मचारी हे लोकसेवक असणे.

२०. सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईस संरक्षण.

२१. नियम करण्याचा केंद्र सरकारचा अधिकार.

२२. विनियम करण्याचा मंडळाचा अधिकार.

२३. संसदेपुढे मांडावयाचे नियम व विनियम.

# तंत्र विकास मंडळ अधिनियम, १९९५

## (१९९५ चा अधिनियम क्रमांक ४४)

(१९ मार्च, २००४ रोजी यथाविद्यमान)

[१६ डिसेंबर, १९९५]

**देशी तंत्रज्ञानाचा विकास आणि वाणिज्यिक वापर करणाऱ्या किंवा देशांतर्गत वापरासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी मोठ्या प्रमाणावर परकीय तंत्रज्ञानाचा अवलंब करणाऱ्या, औद्योगिक संस्था आणि इतर अभिकरणे यांना समन्याय भांडवल किंवा इतर कोणतेही वित्तीय सहाय्य देणारे मंडळ घटित करण्याची तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या सेहेचाळिसाव्या वर्षी संसदेकडून तो पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

प्रकरण एक

**प्रारंभिक**

१. (१) या अधिनियमास "तंत्र विकास मंडळ अधिनियम, १९९५" असे म्हणावे. **संक्षिप्त नाव व प्रारंभ.**

(२) तो, केंद्र सरकार, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास* अंमलात येईल.

२. या अधिनियमात संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,— **व्याख्या.**

(क) "मंडळ" याचा अर्थ, कलम ३ च्या पोटकलम (१) अन्वये घटित केलेले तंत्र विकास मंडळ, असा आहे ;

(ख) "अध्यक्ष" याचा अर्थ, मंडळाचा अध्यक्ष, असा आहे ;

(ग) "निधी" याचा अर्थ, कलम ९ च्या पोटकलम (१) अन्वये घटित केलेला, तंत्र विकास आणि उपयोजन यांकरिता निधी, असा आहे ;

(घ) "सदस्य" याचा अर्थ, मंडळाचा सदस्य, असा आहे ; आणि यात अध्यक्षाचाही समावेश होतो ;

(ङ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे ;

(च) "सचिव" याचा अर्थ, कलम ४ च्या पोटकलम (१) अन्वये नियुक्त केलेला मंडळाचा सचिव, असा आहे ;

(छ) या अधिनियमात वापरलेले परंतु व्याख्या न केलेले आणि संशोधन व विकास उपकर अधिनियम, १९८६ (१९८६ चा ३२) मध्ये व्याख्या केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना त्या अधिनियमात अनुक्रमे नेमून दिलेले अर्थ असतील.

प्रकरण दोन

**तंत्र विकास मंडळ**

**३.** (१) केंद्र सरकार, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, "तंत्र विकास मंडळ" या नावाने एक मंडळ घटित करील. **मंडळाची स्थापना व समावेशन.**

(२) मंडळ हे, वर नमूद केलेल्या नावाचा एक निगमनिकाय असेल आणि त्याची निरंतर परंपरा असेल व त्याची एक सामान्य मुद्रा असेल आणि त्यास या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने, संविदा करण्याचा अधिकार असेल आणि उक्त नावाने त्यास व त्याच्यावर दावा लावता येईल.

---

*१ सप्टेंबर १९९६, स्थायी आदेश क्रमांक ६०२ (ई), दिनांक २८ ऑगस्ट १९९६ पहा.

(३) मंडळ पुढील सदस्यांचे मिळून बनलेले असेल :—

(क) विज्ञान आणि तंत्रज्ञानाशी संबंधित मंत्रालयाचा किंवा केंद्र सरकारी विभागाचा प्रभारी असलेला भारत सरकारचा सचिव — पदसिद्ध अध्यक्ष ;

(ख) शास्त्रीय आणि औद्योगिक संशोधनाशी संबंधित मंत्रालयाचा किंवा केंद्र सरकारी विभागाचा प्रभारी असलेला भारत सरकारचा सचिव — पदसिद्ध ;

(ग) वित्त व्यवस्थेशी (खर्च) संबंधित मंत्रालयाचा किंवा केंद्र सरकारी विभागाचा प्रभारी असलेला भारत सरकारचा सचिव — पदसिद्ध ;

(घ) संरक्षण संशोधन आणि विकासाशी संबंधित मंत्रालयाचा किंवा केंद्र सरकारी विभागाचा प्रभारी असलेला भारत सरकारचा सचिव — पदसिद्ध ;

(ङ) औद्योगिक विकासाशी संबंधित मंत्रालयाचा किंवा केंद्र सरकारी विभागाचा प्रभारी असलेला भारत सरकारचा सचिव — पदसिद्ध ;

(च) ग्रामविकासाशी संबंधित मंत्रालयाचा किंवा केंद्र सरकारी विभागाचा प्रभारी असलेला भारत सरकारचा सचिव — पदसिद्ध ;

(छ) तंत्र विकास आणि उपयोजना, बँक व्यवसाय आणि वित्तव्यवस्था, उद्योग, कृषि व ग्रामविकास यांतील अनुभव असलेल्या व्यक्तींमधून केंद्र सरकारने नियुक्त करावयाच्या, विहित केल्याप्रमाणे चारपेक्षा अधिक नसतील अशा व्यक्ती ; आणि

(ज) मंडळाचा सचिव — पदसिद्ध.

(४) पोटकलम (३) च्या खंड (छं) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सदस्यांचा पदावधी व सेवाविषयक इतर शर्ती, विहित केल्यानुसार असतील.

(५) अध्यक्ष, मंडळाच्या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवण्याव्यतिरिक्त मंडळाने त्याच्याकडे सोपवलेल्या अधिकारांचा वापर करील आणि कर्तव्ये पार पाडील आणि विहित केल्या असतील अशा इतर अधिकारांचा वापर करील आणि अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

(६) मंडळाची कोणतीही कृती किंवा कार्यवाही—

(क) मंडळामध्ये कोणतेही पद रिक्त आहे किंवा त्याच्या स्थापनेत कोणतीही उणीव आहे ;

(ख) मंडळाचा सदस्य म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीच्या नियुक्तीमध्ये कोणतीही उणीव आहे ;

(ग) कोणत्याही प्रकरणाच्या गुणावगुणास बाध न आणणाऱ्या मंडळाच्या कार्यपद्धतीमध्ये कोणतीही नियमबाह्यता आहे,

याच केवळ कारणांवरून, विधिअग्राह्य ठरणार नाही.

**मंडळाचा सचिव आणि इतर अधिकारी व कर्मचारी.**

४. (१) मंडळास, या अधिनियमाखालील आपली कामे कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी त्यास योग्य वाटतील अशा सचिवाची आणि अशा इतर अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करता येईल.

(२) मंडळाचा सचिव आणि इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवेच्या अटी व शर्ती, विनियमांद्वारे निर्धारित केल्याप्रमाणे असतील.

**मंडळाच्या समित्या.**

५. (१) यासंदर्भात केलेल्या नियमांच्या अधीनतेने, मंडळास या अधिनियमाखालील आपली कर्तव्ये व कामे कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी, त्यास योग्य वाटतील अशा समित्यांची नियुक्ती करता येईल.

(२) मंडळास, त्याला योग्य वाटल्यास, मंडळाचे सदस्य नसलेल्या व्यक्तींना पोटकलम (१) अन्वये नेमलेल्या समित्यांचे सदस्य म्हणून स्वीकृत करून घेण्याचा अधिकार असेल आणि अशा रीतीने स्वीकृत केलेल्या व्यक्तीस समितीच्या बैठकींना उपस्थित राहता येईल आणि समितीच्या कामकाजात भाग घेण्याचा अधिकार असेल, परंतु त्याला मतदान करण्याचा अधिकार असणार नाही.

**मंडळाची कार्ये.**

६. मंडळ,—

(क) देशी तंत्रज्ञानाचा वाणिज्यिक वापर करणाऱ्या किंवा देशांतर्गत वापरासाठी मोठ्या प्रमाणावर परकीय तंत्रज्ञानाचा अवलंब करणाऱ्या औद्योगिक संस्था आणि इतर अभिकरणे यांना विनियमांद्वारे निर्धारित केलेल्या असतील अशा शर्तींच्या अधीनतेने, समन्याय भांडवल पुरवील ;

(ख) केंद्र सरकारने मान्यता दिलेली असेल अशा देशी तंत्रज्ञानाचा विकास करण्यात किंवा वाणिज्यिक व्यापारासाठी परकीय तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यात गुंतलेल्या संशोधन व विकास संस्थांना वित्तीय सहाय्य पुरवील ;

(ग) केंद्र सरकारकडून त्याच्याकडे सोपविण्यात येतील अशी इतर कामे पार पाडील.

प्रकरण तीन

## वित्तीय सहाय्य मिळविण्यासाठी अर्ज करणे

**वित्तीय सहाय्य, इत्यादी मिळविण्यासाठी अर्ज करणे.**

७. (१) कलम ६ खाली नमूद केलेल्या प्रयोजनांसाठी वित्तीय सहाय्य मिळविण्यासाठी, विहित केले असेल अशा नमुन्यात मंडळाकडे अर्ज करता येईल.

(२) मंडळ, अर्जाची तपासणी केल्यानंतर आणि त्याला आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, लेखी आदेशाद्वारे, वित्तीय सहाय्य देण्यास मंजुरी देईल किंवा सहाय्य देण्याचे नाकारील :

परंतु, अर्जदारास आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय, वित्तीय सहाय्य देता येणार नाही किंवा ते नाकारता येणार नाही.

प्रकरण चार

## वित्तव्यवस्था, लेखे व लेखापरीक्षा

**केंद्र सरकारकडून अनुदान व कर्जे.**

८. केंद्र सरकार, संसदेने यासंदर्भात विधिद्वारे यथोचित विनियोजन केल्यानंतर त्या शासनास आवश्यक वाटतील अशा रकमांचे अनुदान व कर्जे मंडळास देईल.

**तंत्र विकास व उपयोजना यासाठी निधी.**

९. (१) 'तंत्र विकास व उपायोजना यासाठी निधी', या नावाचा एक निधी घटित करण्यात येईल आणि या निधीमध्ये,—

(क) केंद्र सरकारने कलम ८ अन्वये मंडळास दिलेले कोणतेही अनुदान आणि कर्जे ;

(ख) इतर कोणत्याही साधनांकडून मंडळाला मिळालेल्या एकूण रकमा ;

(ग) निधीतून दिलेल्या रकमांची वसुली ; आणि

(घ) निधीतून गुंतवणूक केलेल्या रकमेवरील उत्पन्न,

जमा करण्यात येईल.

(२) पुढील खर्च भागविण्यासाठी हा निधी वापरण्यात येईल :—

(क) या अधिनियमान्वये प्राधिकृत केलेली उद्दिष्टे व प्रयोजने यांवरील खर्च ;

(ख) मंडळाचे अधिकारी व इतर कर्मचारी यांचे पगार, भत्ते व इतर खर्च ; आणि

(ग) या अधिनियमान्वये मंडळाची कामे पार पाडताना येणारा खर्च.

**जमा रकमा व दायित्वांचे हस्तांतरण.**

१०. या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास व तेव्हापासून,—

(क) भारतीय औद्योगिक विकास बँक अधिनियम, १९६४ (१९६४ चा १८) याच्या कलम १४ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या विकास सहाय्य निधीचा भाग असलेल्या आणि संशोधन व विकास उपकर अधिनियम, १९८६ (१९८६ चा ३२) याच्या कलम ५ अन्वये निर्माण करण्यात आलेल्या 'जोखीम भांडवल निधीमध्ये' जमा असलेल्या रकमा मंडळाकडे हस्तांतरित करता येतील आणि मंडळाकडे निहित होतील ;

(ख) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी विकास बँकेस देय असलेल्या सर्व रकमा मंडळास देय आहेत असे मानण्यात येईल ;

(ग) अशा प्रारंभाच्या लगतपूर्वी विकास बँकेद्वारे देण्यात आलेली सर्व कर्जे, आबंधने व दायित्वे, या बँकेबरोबर केलेल्या संविदा किंवा करार किंवा बँकेसाठी करावयाच्या सर्व बाबी व गोष्टी किंवा 'जोखीम भांडवल निधी' उभारण्याच्या संबंधात केलेल्या गोष्टी, ह्या मंडळाने दिलेली कर्जे, आबंधने व दायित्वे, मंडळाबरोबर केलेल्या संविदा किंवा करार किंवा मंडळासाठी करावयाच्या बाबी व गोष्टी असल्याचे मानण्यात येईल ; आणि

(घ) अशा प्रारंभाच्या लगतपूर्वी विकास बँकेने दाखल केलेले किंवा विकास बँकेविरूद्ध दाखल करावयाचे सर्व दावे आणि इतर न्यायालयीन कार्यवाही मंडळाने दाखल केलेल्या किंवा मंडळाविरूद्ध दाखल करावयाचे दावे आणि न्यायालयीन कार्यवाही असल्याप्रमाणे तशाच चालू राहतील.

अर्थसंकल्प.

११. मंडळ, प्रत्येक वित्तीय वर्षात, विहित केले असेल अशा नमुन्यात व अशा वेळेत पुढील वित्तीय वर्षासाठी मंडळाचा जमा व खर्च दर्शविणारा अर्थसंकल्प तयार करील आणि तो केंद्र सरकारकडे पाठवील.

वार्षिक अहवाल.

१२. मंडळ, प्रत्येक वित्तीय वर्षात, विहित केले असेल अशा नमुन्यात व अशा वेळेत, त्यापूर्वीच्या वित्तीय वर्षातील मंडळाच्या संपूर्ण कामाचा हिशेब देणारा वार्षिक अहवाल तयार करील आणि त्याची एक प्रत केंद्र सरकारकडे पाठवील.

लेखे व लेखापरीक्षा.

१३. (१) मंडळ केंद्र सरकारने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याशी विचारविनिमय करून विहित केला असेल अशा नमुन्यात, हिशेब आणि इतर संबद्ध अहवाल ठेवील आणि वार्षिक विवरणपत्र तयार करील.

(२) या अधिनियमान्वये मंडळाच्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्यासाठी भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक किंवा त्याने यासंदर्भात नियुक्त केलेली इतर कोणतीही व्यक्ती ; हिला, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना सरकारी लेख्यांची लेखापरीक्षा करण्यासाठी जे हक्क व विशेषाधिकार आणि प्राधिकार असतील तेच हक्क व विशेषाधिकार आणि प्राधिकार अशी लेखापरीक्षा करण्यासाठी त्या व्यक्तीला असतील आणि विशेषतः हिशेब पुस्तके, लेखे आणि संबंधित प्रमाणके व इतर कागदपत्रे सादर करण्यास फर्मावण्याचा आणि या अधिनियमाखाली मंडळाच्या कोणत्याही कार्यालयाची तपासणी करण्याचा हक्क असेल.

(३) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक दरवर्षी मंडळाच्या लेख्यांची लेखापरीक्षा करील आणि अशी लेखापरीक्षा करताना झालेला कोणताही खर्च, मंडळ, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना देईल.

(४) मंडळ, विहित असेल अशा दिनांकापूर्वी, लेखापरीक्षकाच्या अहवालासह लेखापरीक्षेची प्रत, केंद्र सरकारला सादर करील.

वार्षिक अहवाल व लेखापरीक्षकाचा अहवाल संसदेपुढे मांडणे.

१४. केंद्र सरकार, वार्षिक अहवाल व लेखापरीक्षकाचा अहवाल तो, प्राप्त झाल्याबरोबर ताबडतोब, संसदेच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडील.

## प्रकरण पाच

## संकीर्ण

मंडळाला विवरणे सादर करणे.

१५. (१) औद्योगिक संस्था किंवा मंडळाकडून वित्तीय सहाय्य मिळवणारी संस्था विनियमांद्वारे निर्धारित केले असेल अशा नमुन्यात व अशा वेळेत मंडळाला विवरणे सादर करील.

(२) मंडळास, पोट-कलम (१) मध्ये निर्देश केलेल्या कोणत्याही औद्योगिक संस्थेला, या कलमान्वये तयार केलेल्या विवरणाचा अचूकपणा पडताळून पाहण्यासाठी कोणत्याही वेळी भेट देण्याकरिता, अधिकारी प्राधिकृत करता येईल.

**निदेश देण्याचा केंद्र सरकारचा अधिकार.**

**१६.** (१) या अधिनियमाच्या पूर्वगामी तरतुदींस बाध न आणता, मंडळ, या अधिनियमाखालील त्याची कामे व कर्तव्ये पार पाडीत असताना, मंडळाने अनुसरावयाच्या धोरणविषयक प्रश्नांवर केंद्र सरकार वेळोवेळी लेखी देईल अशा निदेशांस, बांधील असेल :

परंतु, या पोटकलमाखालील कोणतेही निदेश देण्यापूर्वी मंडळास, व्यवहार्य असेल तेथवर, आपले मत मांडण्याची संधी देण्यात येईल.

(२) धोरणविषयक प्रश्न आहे अथवा नाही हे ठरविण्याचा केंद्र सरकारचा निर्णय अंतिम असेल.

**मंडळ निष्प्रभावी करण्याचा केंद्र सरकारचा अधिकार.**

**१७.** (१) (क) मंडळ, गंभीर संकटांमुळे, या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली सोपविण्यात आलेली कामे व कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ आहे ; किंवा

(ख) या अधिनियमान्वये केंद्र सरकारने दिलेल्या निदेशांचे पालन करण्यात किंवा या अधिनियमाच्या तरतुदींनुसार किंवा त्याखाली सोपविण्यात आलेली कामे व कर्तव्ये पार पाडण्यास कसूर करण्याचा हेका चालवला आहे आणि परिणामी मंडळाची आर्थिक स्थिती किंवा मंडळाचा कारभार घसरत चालला आहे ; किंवा

(ग) सार्वजनिक हिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक आहे अशी परिस्थिती अस्तित्वात आहे, असे केंद्र सरकारचे मत असेल तर ते कोणत्याही वेळी **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे तीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने सहा महिन्यांहून अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी मंडळास निष्प्रभावी करू शकेल.

(२) मंडळास निष्प्रभावी करणारी पोटकलम (१) खालील अधिसूचना प्रसिद्ध झाल्यावर,—

(क) मंडळाचे सर्व सदस्य निष्प्रभावनाच्या दिनांकापासून सदस्य म्हणून त्यांची पदे रिक्त करतील ;

(ख) या अधिनियमाच्या तरतुदींनुसार किंवा त्याखाली मंडळाने किंवा मंडळाच्या वतीने वापरण्यात येणारे सर्व अधिकार, आणि पार पाडावयाची कामे व कर्तव्ये, पोटकलम (३) अन्वये मंडळ पुनर्घटित होईपर्यंत, केंद्र सरकार निदेश देईल अशा व्यक्तीकडून किंवा व्यक्तींकडून ते सर्व अधिकार वापरण्यात येतील आणि ती सर्व कामे व कर्तव्ये पार पाडली जातील ; आणि

(ग) मंडळाच्या मालकीची किंवा त्याच्यांकडून नियंत्रित केली जाणारी सर्व मालमत्ता, पोटकलम (३) अन्वये मंडळ पुनर्घटित होईपर्यंत केंद्र सरकारकडे निहित होईल.

(३) पोटकलम (१) खाली काढलेल्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेला निष्प्रभावनाचा कालावधी संपल्यानंतर, केंद्र सरकार नवीन नियुक्तीद्वारे मंडळाची पुनर्घटना करील आणि अशा प्रकरणी, पोट-कलम (२) च्या खंड (क) अन्वये पद रिक्त करणारी किंवा करणाऱ्या व्यक्ती नियुक्तीसाठी निरर्ह आहेत असे मानले जाणार नाही :

परंतु, निष्प्रभावनाचा कालावधी संपण्यापूर्वी, केंद्र सरकारला, कोणत्याही वेळी, या पोट-कलमान्वये कार्यवाही करता येईल.

(४) केंद्र सरकार, पोटकलम (१) खाली काढलेली अशी अधिसूचना आणि या कलमान्वये केलेली कोणतीही कार्यवाही आणि अशी कार्यवाही करण्यास कारणीभूत ठरलेली परिस्थिती संसदेच्या प्रत्येक सभागृहापुढे लवकरात लवकर मांडील.

**प्रत्यायोजन.**

**१८.** मंडळाला सर्वसाधारण किंवा विशेष लेखी आदेशाद्वारे मंडळाच्या अध्यक्षाकडे किंवा अन्य कोणत्याही सदस्याकडे किंवा अन्य कोणत्याही अधिकाऱ्याकडे, त्या आदेशामध्ये विनिर्दिष्ट करता येतील अशा शर्तींच्या व मर्यादांच्या अधीन, त्याला आवश्यक वाटतील अशा या अधिनियमाखालील त्याच्या अधिकारांचे व कामांचे (कलम २२ खालील अधिकार वगळता) प्रत्यायोजन करता येईल.

**मंडळाचे सदस्य, अधिकारी व कर्मचारी हे लोकसेवक असणे.**

**१९.** या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींनुसार कार्य करीत आहेत किंवा करणे अभिप्रेत आहे असे, मंडळाचे सर्व सदस्य, अधिकारी, कर्मचारी हे भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

**सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईस संरक्षण.**

**२०.** या अधिनियमान्वये किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम किंवा विनियम यांअन्वये सद्भावपूर्वक केलेल्या अथवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही कारवाईबाबत शासन अथवा मंडळ किंवा त्याने नियुक्त केलेली कोणतीही समिती अथवा मंडळाचा किंवा अशा समितीचा सदस्य अथवा शासनाचा किंवा मंडळाचा कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी अथवा शासनाने किंवा मंडळाने प्राधिकृत केलेली अन्य कोणतीही व्यक्ती यांच्याविरुद्ध कोणताही खटला चालविता येणार नाही किंवा अन्य कायदेशीर कारवाई करता येणार नाही.

(शा.म.मु.) एच ४२०९–२ (१०३५–५–०७)

नियम करण्याचा केंद्र सरकारचा अधिकार.

**२१.** (१) केंद्र सरकार, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करू शकेल.

(२) पूर्वगामी तरतुदींच्या सर्वसाधारणतेला बाध न येता, हे नियम, पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबतीत करता येतील, त्या अशा :—

(क) कलम ३ च्या पोटकलम (३) च्या खंड (छ) अनुसार मंडळाच्या सदस्यांची संख्या ;

(ख) कलम ३ च्या पोटकलम (४) अनुसार, मंडळाच्या सदस्यांचा पदावधी व सेवेच्या इतर शर्ती ;

(ग) कलम ३ च्या पोटकलम (५) अनुसार अध्यक्षाचे अधिकार व कर्तव्ये ;

(घ) कलम ५ च्या पोटकलम (१) अनुसार समित्यांची घटना ;

(ड) कलम ७ च्या पोटकलम (१) अनुसार अर्जाचा नमुना ;

(च) मंडळ, ज्या नमुन्यात व ज्यावेळी कलम ११ खालील आपला अर्थसंकल्प व कलम १२ खालील आपला वार्षिक अहवाल तयार करील तो अर्ज व ती वेळ ;

(छ) कलम १३ च्या पोटकलम (१) अनुसार लेख्यांच्या वार्षिक विवरणपत्राचा नमुना आणि ज्या दिनांकापूर्वी त्या लेख्यांची लेखापरीक्षेची प्रत त्या कलमाच्या पोटकलम (४) खाली केंद्र सरकारला सादर करता येईल तो दिनांक ;

(ज) विहित असेल किंवा करता येईल अशी किंवा जिच्याबाबत नियमांद्वारे तरतुदी केल्या असतील किंवा करता येतील, अशी अन्य कोणतीही बाब.

विनियम करण्याचा मंडळाचा अधिकार.

**२२.** (१) मंडळ, केंद्र सरकारच्या पूर्वमान्यतेने **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाशी व सर्वसाधारणपणे त्याच्या तरतुदींचे पालन करण्यासाठी केलेल्या नियमांशी सुसंगत असे विनियम करू शकेल.

(२) विशेषतः व पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेला बाध न येता, पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबतीत हे विनियम करता येतील, त्या अशा :—

(क) कलम ४ च्या पोटकलम (२) अनुसार मंडळाचे सचिव आणि अन्य अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवेबाबतच्या अटी व शर्ती ;

(ख) कलम ६ च्या खंड (क) अनुसार मंडळाला ज्यांच्या अधीन समन्याय भांडवलाची तरतूद करता येईल अशा शर्ती ;

(ग) कलम १५ च्या पोटकलम (१) अनुसार ज्या नमुन्यात व ज्यावेळी मंडळाला विवरणे सादर करता येतील तो नमुना व ती वेळ.

संसदेपुढे मांडावयाचे नियम व विनियम.

**२३.** या अधिनियमाखाली केलेला प्रत्येक नियम व प्रत्येक विनियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेले किंवा दोन वा त्याहून अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेले असेल अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीत सत्रासीन असताना ठेवला जाईल आणि ते सत्र व उपरोक्त क्रमवर्ती सत्रे यांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात किंवा विनियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले किंवा तो नियम किंवा विनियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर तो नियम किंवा, विनियम अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, यथास्थिति, मुळीच परिणामक होणार नाही. तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे तत्पूर्वी त्या नियमाखाली किंवा विनियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

# THE TECHNOLOGY DEVELOPMENT BOARD ACT, 1995

## तंत्र विकास मंडळ अधिनियम, १९९५

### इंग्रजी — मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| accounts | लेखे | [chapter 4] |
| accuracy | अचूकपणा | [Sec.15(*2*)] |
| agency | अभिकरण | [Sec.6(*a*)] |
| agreement | करार | [Sec.10(*c*)] |
| annual report | वार्षिक अहवाल | [Sec.12] |
| annulment | शून्यीकरण | [Sec.23] |
| application | उपयोजन | [Sec.2(*c*)] |
| appropriation | विनियोजन | Sec.9] |
| assigned | नेमून दिलेले | [Sec.2(*g*)] |
| audit | लेखापरीक्षा | Chapter 4] |
| Audittor General | महालेखापरीक्षक | [Sec.13(*1*)] |
| authorised | प्राधिकृत | Sec.9(*2*)(*a*)] |
| body corporate | निगम निकाय | [Sec.3(*2*)] |
| budget | अर्थसंकल्प | Sec.11] |
| chairperson | अध्यक्ष | [Sec.2(*b*)] |
| commercial | वाणिज्यिक | [Sec.6(*a*)] |
| common seal | सामान्य मुद्रा | [Sec.3(*2*)] |
| comptroller | नियंत्रक | [Sec.13(*c*)] |
| conditions of service | सेवाविषयक शर्ती | [Sec.3(*4*)] |
| consistent | सुसंगत | [Sec.22(*1*)] |
| constituted | घटित | [Sec.2(a)] |
| contract | संविदा | [Sec.10(*c*)] |
| deemed | अभिप्रेत असलेले | [Sec.19] |
| default | कसूर | [Sec.17(*1*)(*b*)] |
| defect | उणीव | [Sec.3(*c*)(a)] |
| defined | व्याख्या केलेले | [Sec.2(*g*)] |
| delegate | प्रत्यायोजन | [Sec.18] |
| deteriorate | घसरणे | [Sec.17(1)(*b*)] |
| determined | निर्धारित | [Sec.4(*2*)] |
| Development Bank | विकास बँक | [Sec.10(*c*)] |
| disqualified | निरर्ह | [Sec.17(*3*)] |
| efficient | कार्यक्षम | [Sec.5(*1*)] |
| equity capital | समन्याय भंडवल | [Preamble] |
| except | वगळणे | [Sec.18] |
| ex-officio | पदसिद्ध | [Sec.3(*3*)(*a*)] |

| | | |
|---|---|---|
| finance | वित्त व्यवस्था | [Sec.3(*3*)(*c*)] |
| financial year | वित्तीय वर्ष | [Sec.10(*c*)] |
| foregoing | पूर्वगामी | [Sec.22(*2*)] |
| foregoing provisions | पूर्वगामी तरतुदी | [Sec.16(*1*)] |
| fund | निधी | [Sec.2(*c*)] |
| generality | सर्वसाधारणता | [Sec.22(*2*)] |
| grant | सहाय्य | [Sec.7(*1*)] |
| grave emergency | गंभीर संकट | [Sec.17(*1*)(*a*)] |
| imported technology | परकीय तंत्रज्ञान | [Sec.6(*b*)] |
| income | उत्पन्न | [Sec.9(*1*)(*d*)] |
| indigenous technology | देशी तंत्रज्ञान | [Preamble] |
| in particular | विशेषतः | [Sec.22(*2*)] |
| invalid | विधिअग्राह्य | [Sec.3(*b*)] |
| irregularity | नियमबाह्यता | [Sec.3(*b*)(*c*)] |
| legal proceeding | कायदेशीर कारवाई | [Sec.20] |
| liability | दायित्व | [Sec.10(m.n.)] |
| member | सदस्य | [Sec.2(*d*)] |
| merit of the case | प्रकरणाचे गुणावगुण | [Sec.3(b)(*c*)] |
| modification | आपरिवर्तन | [Sec.23] |
| perpetual succession | निरंतर परंपरा | [Sec.3(*2*)] |
| persistance | हेका | [Sec.17(*1*)(*b*)] |
| practicable | व्यवहार्य | [Sec. 13(*1*)] |
| prescribed | विहित | [Sec.2(*e*)] |
| previous approval | पूर्वमान्यतेने | [Sec.22(*1*)] |
| privileges | विशेषाधिकार | [Sec.13(*2*)] |
| prosecution | खटला | [Sec.20] |
| public interest | सार्वजनिक हित | [Sec.17(*1*)(*c*)] |
| public servant | लोकसेवक | [Sec.19] |
| reconstituted | पुनर्घटित | [Sec.17(*2*)(*b*)] |
| refusal | नकार | [Sec.7(*2*)] |
| regulations | विनियम | [Sec.22(*1*)] |
| research | संशोधन | [Sec.2(*g*)] |
| return | विवरण | [Sec.15(*1*)] |
| right | हक्क | [Sec.13(2)] |
| rules by notification | अधिसचूनेद्वारे नियम | [Sec.20] |
| rural development | ग्राम विकास | [Sec.3(3)(*f*)] |
| successive session | क्रमवर्ती सत्र | [Sec.23] |
| suit | दावा | [Sec.3(*2*)] |
| supersede | निष्प्रभावी | [Sec.17(m.n.)] |
| Technology Development Board. | तंत्र विकास मंडळ | [Sec.1(*1*)] |

| | | |
|---|---|---|
| term of office | पदावधी | [Sec.3(*4*)] |
| to co-opt | स्वीकृत करून घेणे | [Sec.5(*2*)] |
| to determind by regulations | विनियमांद्वारे निर्धारित करणे | [Sec.6(*a*)] |
| to impose | सोपवणे | [Sec.17(*1*)(*b*)] |
| to preside | अध्यक्षपद भूषवणे | [Sec.3(*5*)] |
| to sue | दावा लावणे | [Sec.3(*2*)] |
| transfer of money receipts | जमा रकमांचे हस्तांतरण | [Sec.10(*a*)] |
| under | अनुसार | [Sec.21(*2*)] |
| vacant | रिक्त पद | [Sec.17(*2*)(*a*)] |
| validity | विधिग्राह्यता | [Sec.23] |
| venture capital fund | जोखिम भांडवल निधी | [Sec.10(*a*)] |
| vest | निहित | [Sec.17(*2*)(*c*)] |
| without prejudice | बाध न आणता | [Sec.22(*2*)] |

---

## तंत्र विकास मंडळ अधिनियम, १९९५

## THE TECHNOLOGY DEVELOPMENT BOARD ACT, 1995

### मराठी — इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अचूकपणा | accuracy | [कलम १५(२)] |
| अधिसूचनेद्वारे नियम | rules by notification | [कलम २०] |
| अध्यक्ष | chairperson | [कलम २(ख)] |
| अध्यक्षपद भूषवणे | to preside | [कलम ३(५)] |
| अनुसार | under | [कलम २१(२)] |
| अभिकरण | agency | [कलम ६(क)] |
| अभिप्रेत असलेले | deemed | [कलम १९] |
| अर्थसंकल्प | budget | [कलम ११] |
| आपरिवर्तन | modification | [कलम २३] |
| उणीव | defect | [कलम ३(६)(क)] |
| उत्पन्न | income | [कलम ९(१)(घ)] |
| उपयोजन | application | [कलम २(ग)] |
| करार | agreement | [कलम १०(ग)] |
| कसूर | defult | [कलम १७(१)(ख)] |
| कायदेशीर कारवाई | legal proceeding | [कलम २०] |
| कार्यक्षम | efficient | [कलम ५(१)] |
| क्रमवर्ती सत्र | successive session | [कलम २३] |
| खटला | prosecution | [कलम २०] |
| गंभीर संकट | grave emergency | [कलम १७(१)(क)] |
| ग्रामविकास | Rural Development | [कलम ३(३)(च)] |
| घटित | constituted | [कलम २(क)] |
| घसरणे | deteriorate | [कलम १७(१)(ख)] |
| जमा रकमांचे हस्तांतरण | transfer of money receipts | [कलम १०(क)] |
| जोखिम भांडवल निधी | venture capital fund | [कलम १०(क)] |
| तंत्र विकास मंडळ | Technology Development Board | [कलम १(१)] |
| दायित्व | liability | [कलम १० स.टी] |
| दावा | suit | [कलम ३(२)] |
| दावा लावणे | to sue | [कलम ३(२)] |
| देशी तंत्रज्ञान | indigenous technology | [उद्देशिका] |
| नकार | refusal | [कलम ७(२)] |
| निगम निकाय | body corporate | [कलम ३(२)] |
| निधी | fund | [कलम २(ग)] |
| नियमबाह्यता | irreqularity | [कलम ३(६)(ग)] |
| नियंत्रक | comptroller | [कलम १३(ग)] |
| निरर्ह | disqualified | [कलम १७(३)] |

| | | |
|---|---|---|
| निरंतर परंपरा | perpetual succession | [कलम ३(२)] |
| निर्धारित | determined | [कलम ४(२)] |
| निष्प्रभावी | supersede | [कलम १७ स.टी] |
| निहित | vest | [कलम १७(२)(ग)] |
| नेमून दिलेले | assigned | [कलम २(छ)] |
| पदसिद्ध | ex-officio | [कलम ३(३)(क)] |
| पदावधी | term of office | [कलम ३(४)] |
| परकीय तंत्रज्ञान | imported technology | [कलम ६(ख)] |
| पुनर्घटित | reconstituted | [कलम १७(२)(ख)] |
| पूर्वगामी | foregoing | [कलम २२(२)] |
| पूर्वगामी तरतुदी | foregoing provisions | [कलम १६(ग)] |
| पूर्वमान्यतेने | previous approval | [कलम २२(१)] |
| प्रकरणाचे गुणावगुण | merit of the case | [कलम ३(६)(ग)] |
| प्रत्यायोजन | delegate | [कलम १८] |
| प्राधिकृत | authorised | [कलम ९(२)(क)] |
| बाध न आणता | without prejudice | [कलम २२(२)] |
| महालेखापरीक्षक | Auditor General | [कलम १३(१)] |
| रिक्त पद | vacant office | [कलम १७(२)(क)] |
| लेखापरीक्षा | audit | [प्रकरण चार] |
| लेखे | accounts | [प्रकरण चार] |
| लोकसेवक | public servant | [कलम १९] |
| वगळणे | except | [कलम १८] |
| वाणिज्यिक | commercial | [कलम ६(क)] |
| वार्षिक अहवाल | annual report | [कलम १२] |
| विकास बँक | Development Bank | [कलम १०(ग)] |
| वित्त व्यवस्था | finance | [कलम ३(३)(ग)] |
| वित्तीय वर्ष | financial year | [कलम १०(ग)] |
| विधिअग्राह्य | invalid | [कलम ३(६) (ख)] |
| विधिग्राह्यता | validity | [कलम २३] |
| विनिमय | requlations | [कलम २२(१)] |
| विनियमांद्वारे निर्धारित करणे | to determind by regulations | [कलम ६(क)] |
| विनियोजन | appropriation | [कलम ८] |
| विवरण | return | [कलम १५(१)] |
| विशेषत: | in particular | [कलम २२(२)] |
| विशेषाधिकार | privileges | [कलम १३(२)] |
| विहित | prescribed | [कलम २(ड)] |
| व्यवहार्य | practicable | [कलम १३(१)] |
| व्याख्या केलेले | defined | [कलम २(छ)] |
| शून्यीकरण | annulment | [कलम २३] |

| | | |
|---|---|---|
| सदस्य | member | [कलम २(घ)] |
| समन्याय भांडवल | equity capital | [उद्देशिका] |
| सर्वसाधारणता | generality | [कलम २२(२)] |
| सहाय्य | grant | [कलम ७(१)] |
| सामान्य मुद्रा | common seal | [कलम ३(२)] |
| सार्वजनिक हित | public interest | [कलम १७(१)(ग)] |
| सुसंगत | consistent | [कलम २२(१)] |
| सेवाविषयक शर्ती | conditions of service | [कलम ३(४)] |
| सोपवणे | to impose | [कलम १७(१)(ख)] |
| संविदा | contract | [कलम १०(ग)] |
| संशोधन | research | [कलम २(छ)] |
| स्वीकृत करून घेणे | to co-opt | [कलम ५(२)] |
| हक्क | right | [कलम १३(२)] |
| हेका | persistance | [कलम १७(१)(ख)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई